दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | शुक्रवार, दि. २४ जुलै २०२६ | वर्ष - १ | अंक - २९६ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

### आजचे पंचांग

दिनांक : २४ जुलै २०२६ वार : शुक्रवार माह (अमावस्यांत) : आषाढ माह (पूर्णिमांत) : आषाढ ऋतु : वर्षा आयन : दक्षिणायन पक्ष : शुक्ल पक्ष तिथी : दशमी तिथी (सकाळी ०९:१२ पर्यंत) त्यानंतर एकादशी तिथी नक्षत्र : अनुराधा नक्षत्र (२५ जुलै पहाटे ०४:३६ पर्यंत) त्यानंतर ज्येष्ठा नक्षत्र योग : शुक्ल योग (रात्री ०८:१० पर्यंत) त्यानंतर ब्रह्म योग करण : गराजा करण (सकाळी ०९:१२ पर्यंत)

### क्रेनच्या चाकाखाली सापडून महिलेचा मृत्यू

**पुणे :** क्रेनच्या चाकाखाली सापडून पादचारी महिलेचा मृत्यू झाल्याची घटना पुणे-अहिल्यानगर रस्त्यावरील वाघोली परिसरात घडली. या प्रकरणी क्रेन चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत स्वप्नील पांडुरंग शिंदे (वय ३२, रा. हिंदवी पार्क, केसनंद रस्ता, वाघोली) यांनी वाघोली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, स्वप्नील शिंदे यांच्या पत्नी २० जुलै रोजी सकाळी वाघोली परिसरातून निघाल्या होत्या. त्यावेळी पेट्रोल पंपाजवळ क्रेनने शिंदे यांच्या पत्नीला धडक दिली.

## सारांश वृत्त

### आश्रमशाळांतील सुविधा वेळेत द्या; विद्यार्थ्यांच्या आरोग्य व शिक्षणात हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई । वृत्तसंस्था :** आदिवासी विकास विभागाच्या आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांना गणवेशासह सर्व आवश्यक सुविधा वेळेत उपलब्ध करून द्याव्यात आणि त्यांच्या शिक्षणात कोणताही अडथळा येणार नाही, याची अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी, असे निर्देश आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके यांनी दिले. अमरावती विभागातील आश्रमशाळा व वसतिगृहांच्या आढावा बैठकीत त्यांनी स्वच्छ परिसर, शुद्ध पिण्याचे पाणी, सकस भोजन आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्यास सांगितले. प्रकल्प अधिकाऱ्यांनी नियमित पाहणी करून विद्यार्थ्यांच्या तक्रारी तातडीने निकाली काढाव्यात,

तसेच साहित्य वितरणाची माहिती गुगल शीटवर अद्ययावत ठेवून तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करावा, असेही त्यांनी स्पष्ट केले. आश्रमशाळांतील शैक्षणिक, क्रीडा व सांस्कृतिक यशोगाथांना व्यापक प्रसिद्धी देण्याच्या सूचनांसह राणी दुर्गावती आदिवासी महिला सक्षमीकरण योजनेच्या अंमलबजावणीचाही त्यांनी आढावा घेतला.

# सर्वोच्च न्यायालयाच्या प्रांगणात संविधानाचे वाचन

# विद्यार्थी आंदोलनला वकिलांचा पाठिंबा!

## आता सरन्यायाधीश न्यायाची बाजू स्पष्ट करणार का?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**दिल्ली । वृत्तविश्लेषण**

देशभर सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर गुरुवारी सर्वोच्च न्यायालयाच्या आवारात एक महत्त्वपूर्ण आणि प्रतीकात्मक घटना घडली. न्यायालयाच्या जेवणाच्या सुट्टीदरम्यान सर्वोच्च न्यायालयातील अनेक वरिष्ठ वकील एकत्र आले आणि लोकशाही वाचवा, संविधान वाचवा या अभियानांतर्गत भारतीय संविधानाच्या प्रस्तावनेचे (झअ‍ॅशरालश्रश) सामूहिक वाचन केले. न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या घटनात्मक मूल्यांप्रती आपली बांधिलकी त्यांनी पुन्हा व्यक्त केली.

या उपक्रमाचे नेतृत्व ज्येष्ठ विधिज्ञ इंदिरा जयसिंग आणि डॉ. एस. मुरलीधर यांनी केले. सर्वोच्च न्यायालय बार असोसिएशनचे अध्यक्ष विकास सिंह यांच्यासह आनंद ग्रोव्हर, अंजना प्रकाश, संजय घोष, शादान फरासत, अरुंधती काटजू, वृंदा ग्रोव्हर आणि अनेक वरिष्ठ व तरुण वकिलांनी यात सहभाग घेतला. अनेकांच्या हातात भारतीय तिरंगा आणि संविधानाची प्रत होती.

प्रसारमाध्यमांशी बोलताना इंदिरा जयसिंग म्हणाल्या, आम्ही विद्यार्थ्यांच्या पाठीशी उभे आहोत. आम्ही स्वतःसाठी आंदोलन करत नाही, तर विद्यार्थ्यांच्या न्यायासाठी येथे आलो आहोत. सर्वोच्च न्यायालयाचे कर्तव्य न्याय देणे आहे आणि म्हणूनच न्यायाच्या मंदिरासमोर आम्ही न्यायाची मागणी करत आहोत.

ही घटना केवळ संविधानाच्या प्रस्तावनेचे वाचन नव्हते; ती न्यायव्यवस्थेतील वकिलांकडून घटनात्मक मूल्यांच्या संरक्षणासाठी व्यक्त झालेली सार्वजनिक भूमिका होती. विशेषतः विद्यार्थी आंदोलनांवर होत असलेल्या कारवाया, आंदोलकांवरील पोलिसी हस्तक्षेप आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरील चर्चेच्या पार्श्वभूमीवर या कृतीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

मात्र या घडामोडीनंतर एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होतो. जेव्हा सर्वोच्च न्यायालयातील वरिष्ठ वकील सार्वजनिकपणे विद्यार्थ्यांच्या न्यायाच्या बाजूने उभे राहत आहेत, तेव्हा सर्वोच्च न्यायालय स्वतः या प्रश्नांकडे किती तातडीने आणि संवेदनशीलतेने पाहणार? देशातील अनेक विद्यार्थी आणि नागरिक आता न्यायालयाकडून घटनात्मक अधिकारांच्या संरक्षणाबाबत ठोस हस्तक्षेपाची अपेक्षा व्यक्त करत आहेत. याच अनुषंगाने आणखी एक प्रश्न चर्चेत आहे. सरन्यायाधीश भविष्यात या विषयावरील प्रकरणांच्या सुनावणीदरम्यान घटनात्मक स्वातंत्र्य, शांततापूर्ण आंदोलनाचा अधिकार आणि विद्यार्थ्यांच्या मूलभूत अधिकारांबाबत स्पष्ट निरीक्षणे नोंदवतील का? याचे उत्तर सध्या कुणाकडेही नाही. कारण न्यायालयाचा निर्णय केवळ न्यायालयीन प्रक्रियेनंतरच समोर येतो आणि त्याबाबत कोणताही अंदाज बांधणे योग्य ठरणार नाही.


तथापि, सर्वोच्च न्यायालयाच्या आवारात संविधानाच्या प्रस्तावनेचे सामूहिक वाचन ही घटना भारतीय लोकशाहीसाठी एक महत्त्वपूर्ण संदेश देणारी ठरली आहे. न्यायव्यवस्थेशी संबंधित अनेक वरिष्ठ विधिज्ञांनी संविधानातील मूल्यांप्रती सार्वजनिक निष्ठा व्यक्त केली आहे. आता देशाचे लक्ष न्यायालयीन प्रक्रियेकडे लागले असून, विद्यार्थ्यांच्या आंदोलनांशी संबंधित प्रकरणांमध्ये सर्वोच्च न्यायालय घटनात्मक अधिकारांचे संरक्षण कशा प्रकारे करते, याकडे संपूर्ण देशाचे लक्ष असेल.

## ‘५० ग्रॅम पावडर खिशात टाकेन’ : पोलिसाची धमकी की न्यायव्यवस्थेलाच धक्का? थेट निलंबन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई । प्रतिनिधी**

पुन्हा दिसलास तर ५० ग्रॅमची पावडर खिशात टाकेन अशी धमकी एका विद्यार्थ्याला देणाऱ्या मुंबई पोलिसाच्या व्हिडिओने राज्यात मोठी खळबळ उडवली आहे. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या या व्हिडिओनंतर सायन पोलिस ठाण्यात चालक म्हणून कार्यरत असलेल्या पवन सांगळे याला गृहखात्याच्या आदेशानंतर निलंबित करण्यात आले. मात्र या कारवाईने वाद संपलेला नसून अनेक गंभीर प्रश्न उभे राहिले आहेत.



गुरुवारी राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या संयुक्त पत्रकार परिषदेत राज ठाकरे यांनी हा व्हिडिओ दाखवत सवाल केला की, पोलिस ५० ग्रॅम पावडर टाकण्याची भाषा करतो, म्हणजे त्याच्याकडे अमली पदार्थ सहज उपलब्ध आहेत का? या प्रश्नानंतर काही तासांतच संबंधित पोलिसावर निलंबनाची कारवाई झाली.

दरम्यान, महाराष्ट्र काँग्रेसनेही या प्रकरणावर आक्रमक भूमिका घेत पोलिस महासंचालकांची भेट घेतली.

प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी या घटनेची उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या देखरेखीखाली स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी केली. जर एखादा पोलिस नागरिकाला खोट्या ड्रग्ज प्रकरणात अडकवण्याची धमकी देत असेल, तर ही केवळ एका कर्मचाऱ्याची चूक मानायची की व्यवस्थेतील गंभीर बिघाड? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

## पेपरफुटीवर ठाकरे बंधू आक्रमक : ‘विद्यार्थ्यांचा आवाज दाबू नका’

### २६ जुलैला मुंबईत विराट विद्यार्थी-पालक मोर्चाची घोषणा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई । प्रतिनिधी**

देशभरात पेपरफुटीच्या आरोपांवरून सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील राजकारणही तापले असून, राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी विद्यार्थ्यांच्या समर्थनार्थ संयुक्त भूमिका घेत केंद्र सरकारवर तीव्र टीका केली आहे. शिवतीर्थ येथे झालेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत २६ जुलै रोजी विद्यार्थी, पालक आणि नागरिकांचा मुंबईत विराट मोर्चा काढण्याची घोषणा करण्यात आली.

राज ठाकरे यांनी आरोप केला की, सुरुवातीला शांततेत सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनावर दबाव टाकून ते दडपण्याचा प्रयत्न झाला. सत्तेवर बसताना यशाचे श्रेय घ्यायचे, पण अपयशाची जबाबदारी स्वीकारायची नाही, ही भूमिका लोकशाहीसाठी घातक आहे, असे ते म्हणाले. संबंधित प्रकरणाची नैतिक जबाबदारी निश्चित व्हावी, अशी मागणी त्यांनी केली.

परीक्षा व्यवस्थेवरही त्यांनी गंभीर प्रश्न उपस्थित करत, परीक्षा पूर्णपणे केंद्रीकृत करण्याच्या निर्णयावर आपण यापूर्वीच आक्षेप घेतल्याचा दावा केला. सत्तेच्या अहंकारामुळे त्या सूचनांकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोपही त्यांनी केला. त्यांच्या मते, हा वाद आता केवळ केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यापुरता मर्यादित राहिलेला नसून, तो केंद्र सरकारच्या उत्तरदायित्वाचा प्रश्न बनला आहे.

पंतप्रधानांनी आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधायला हवा होता, असे मत व्यक्त करत राज ठाकरे म्हणाले की, विद्यार्थ्यांचा आवाज ऐकण्याऐवजी आंदोलनाकडे दुर्लक्ष करणे हा लोकशाहीतील संवादाचा अभाव दर्शवतो.

## १.७० कोटी कुटुंबांना स्मार्ट शिधापत्रिका; क्यूआर कोडमुळे रेशन व्यवस्थेत पारदर्शकतेचा दावा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील सुमारे १.७० कोटी शिधापत्रिकाधारक कुटुंबांना क्यूआर कोड आधारित स्मार्ट शिधापत्रिका उपलब्ध करून देण्याच्या महत्त्वाकांक्षी मोहिमेची घोषणा राज्य सरकारने केली आहे. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते येवला (जि. नाशिक) येथे ‘स्वर्गीय अजितदादा पवार लोककल्याण स्मार्ट शिधापत्रिका वितरण मोहिमे’चा शुभारंभ करण्यात आला.

पुढील तीन वर्षांत राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना (अअध, झकक) तसेच एपीएल-शेतकरी योजनेतील लाभार्थ्यांना या स्मार्ट शिधापत्रिका मोफत वितरित केल्या जाणार आहेत. नंदुरबार आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांत प्रायोगिक अंमलबजावणीनंतर हा प्रकल्प संपूर्ण राज्यात टप्प्याटप्प्याने राबविण्यात




येईल. कागदी शिधापत्रिकांऐवजी क्यूआर कोड आधारित कार्डमुळे लाभार्थ्यांची माहिती अधिक सुरक्षित राहील, बनावट नोंदींवर नियंत्रण मिळेल आणि रेशन वितरण व्यवस्था अधिक पारदर्शक व कार्यक्षम होईल, असा सरकारचा दावा आहे.

## मुंबईत ५३ लाख वाहनांचा ताण; स्क्रॅपिंग केंद्राचा प्रस्ताव पुन्हा चर्चेत, अंमलबजावणीचे आव्हान कायम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबईतील वाढती वाहतूक कोंडी, रस्त्यांवर पडून असलेली बेवारस वाहने आणि पार्किंगच्या गंभीर समस्येच्या पार्श्वभूमीवर मुंबई महानगर प्रदेशात अत्याधुनिक रजिस्टर्ड व्हेईकल स्क्रॅपिंग फॅसिलिटी (ठतडऋ) उभारण्याचे निर्देश पालकमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी दिले. मात्र, हा प्रस्ताव नवीन नसून प्रत्यक्षात केंद्र कधी उभे राहणार, हा प्रश्न अद्याप अनुत्तरित आहे.

बैठकीत मुंबईत सुमारे ५३ लाख वाहने असल्याची माहिती देण्यात आली. यामध्ये १५ लाख चारचाकी, ३० लाखांहून अधिक दुचाकी आणि ५ ते ६ लाख व्यावसायिक वाहनांचा समावेश आहे. देशातील सर्वाधिक वाहनघनता असलेल्या मुंबईत जालना, तळोजा, पालघर किंवा भिवंडीसारख्या ठिकाणी स्क्रॅपिंग सुविधा असल्या तरी शहरात अधिकृत केंद्र नसल्याने नागरिकांना त्याचा लाभ मिळत नाही.

राष्ट्रीय वाहन स्क्रॅपिंग धोरणानुसार २० वर्षांपेक्षा



जुनी खासगी आणि १५ वर्षांपेक्षा जुनी व्यावसायिक वाहने फिटनेस चाचणीत अपात्र ठरल्यास स्क्रॅपसाठी पात्र ठरतात. त्यासाठी करसवलत, नोंदणी शुल्कात सूट आणि वाहनाच्या किमतीच्या ४ ते ६ टक्क्यांपर्यंत स्क्रॅप मूल्याची तरतूद आहे. तरीही मुंबईत अशा वाहनांची संख्या मोठी असताना अधिकृत यंत्रणा उभारण्यात झालेला विलंब प्रश्नचिन्ह निर्माण करतो.

बैठकीत सार्वजनिक-खासगी भागीदारीत (झझझ) सुमारे पाच एकर जागेवर केंद्र उभारणे, निविदा प्रक्रिया राबविणे आणि संबंधित विभागांमध्ये समन्वय वाढविण्याचे निर्देश देण्यात आले. मात्र, घोषणांपेक्षा अंमलबजावणी महत्त्वाची असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

मुंबईतील बेवारस वाहनांचा प्रश्न अनेक वर्षांपासून कायम असून, स्क्रॅपिंग केंद्राची उभारणी प्रत्यक्षात कधी पूर्ण होते आणि त्यामुळे वाहतूक कोंडी व पार्किंगच्या समस्येत कितपत दिलासा मिळतो, यावरच या निर्णयाचे यश अवलंबून असेल.

## एसडीजीमध्ये देशात अव्वल होण्याचे लक्ष्य; पण वास्तवात महाराष्ट्र अजूनही निर्देशांकांशी झुंजतोय?

■ दैनिक राज्य लोकतंत्र


**मुंबई । विशेष वृत्त**

महाराष्ट्राने शाश्वत विकास उद्दिष्टांच्या (ड्ऱ्र) सर्व निर्देशांकांमध्ये देशात अव्वल स्थान मिळवावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. पुढील चार वर्षांसाठी विभागनिहाय, परिणामाधारित (जींलेश-इरीशव) नियोजन, रिअल-टाइम डेटा आणि प्रत्येक विभागासाठी कामगिरी निर्देशांक (घझख) निश्चित करण्यावर त्यांनी भर दिला. मात्र या घोषणेनंतर एक मूलभूत प्रश्न पुन्हा समोर येतोमहाराष्ट्राची खरी अडचण नियोजनाची आहे की अंमलबजावणीची?

मुख्यमंत्र्यांनी आकांक्षित १० जिल्हे आणि १७७ तालुक्यांमध्ये विशेष लक्ष देण्याच्या सूचना दिल्या. तसेच प्रत्येक तीन महिन्यांनी ड्ऱ्र प्रगतीचा आढावा घेण्याचेही निर्देश दिले. परंतु अनेक वर्षांपासून अशाच प्रकारच्या आढावा बैठका, सादरीकरणे आणि लक्ष्य निश्चिती होत असताना अनेक सामाजिक निर्देशांकांमध्ये अपेक्षित सुधारणा का दिसत नाही, हा प्रश्न कायम आहे.

बैठकीत रिअल-टाइम डेटा आणि डेटा गॅप भरून काढण्यावर विशेष भर देण्यात आला. म्हणजेच सरकारने स्वतःच मान्य केले की उपलब्ध आकडेवारी आणि प्रत्यक्ष परिस्थितीमध्ये तफावत असू शकते. जर धोरणे तयार करताना विश्वासार्ह आणि अद्ययावत माहितीच उपलब्ध नसेल, तर विकासाच्या दाव्यांचे मूल्यमापन नेमके कोणत्या आधारावर केले जाणार?

मुख्यमंत्र्यांनी परिणामकेंद्री प्रशासनाची गरज व्यक्त करत आरोग्य, शिक्षण, पायाभूत सुविधा आणि सामाजिक विकास क्षेत्रात प्रत्यक्ष बदल मोजण्याचे निर्देश दिले. ही भूमिका महत्त्वाची असली तरी राज्यात अजूनही अनेक




भागांमध्ये दर्जेदार आरोग्य सेवा, शिक्षणाची गुणवत्ता, कुपोषण, पिण्याचे पाणी आणि ग्रामीण-शहरी विषमता यांसारखे प्रश्न कायम आहेत. त्यामुळे घोषणांपेक्षा प्रत्यक्ष परिणाम अधिक महत्त्वाचे ठरणार आहेत.

महाराष्ट्र ऊर्जा आणि शाश्वत शहरांसारख्या काही क्षेत्रांत चांगली कामगिरी करत असला, तरी सर्व जिल्ह्यांमध्ये समान विकास झालेला नाही. विदर्भ, मराठवाडा आणि काही आदिवासी भागांतील सामाजिक निर्देशांक अजूनही राज्याच्या सरासरीपेक्षा मागे आहेत. त्यामुळे राज्याच्या एकूण क्रमवारीपेक्षा विकासाचा लाभ शेवटच्या नागरिकापर्यंत पोहोचतो का, हा खरा निकष ठरणार आहे.

सरकारने नीती आयोगाच्या ड्ऱ्र निर्देशांकांना राज्याच्या प्रगतीचा आरसा म्हटले आहे. मात्र आरसा केवळ वास्तव दाखवतो; वास्तव बदलण्यासाठी सातत्यपूर्ण अंमलबजावणी, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व आवश्यक असते. पुढील चार वर्षांत महाराष्ट्र खरोखरच देशात अव्वल ठरतो की पुन्हा एकदा लक्ष्य आणि वास्तव यांच्यातील अंतर कायम राहते, याकडे आता सर्वांचे लक्ष असेल.

## संपादकीय

### घोषणांचा महापूर, उत्तरांचा दुष्काळ.

२०१४ नंतर देशाच्या राजकारणात मोठे बदल झाले. पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक, डिजिटल इंडिया, परराष्ट्र धोरण, कल्याणकारी योजना आणि प्रशासनातील तांत्रिक बदल यांसारख्या अनेक उपक्रमांना व्यापक प्रसिद्धी मिळाली. त्याचबरोबर बेरोजगारी, परीक्षा व्यवस्थेतील गैरव्यवहार, महागाई, शेतकरी आंदोलन, विद्यार्थी आंदोलन, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि संस्थांच्या स्वायत्ततेबाबतही अनेक प्रश्न उपस्थित झाले. या प्रश्नांवर समाजात मतभेद असू शकतात; परंतु त्यावर चर्चा होणे हे लोकशाहीच्या आरोग्यासाठी आवश्यकच आहे.

आजचा युवक केवळ राजकीय घोषणांनी किंवा व्यक्तिपूजेमुळे प्रभावित होत नाही. डिजिटल युगात वाढलेल्या या पिढीकडे माहिती मिळवण्याची अनेक साधने आहेत. सोशल मीडिया, स्वतंत्र पत्रकारिता, विविध डिजिटल प्लॅटफॉर्म आणि माहितीचा अधिकार यामुळे युवक केवळ ऐकून विश्वास ठेवत नाही, तर तो तथ्यांची पडताळणी करण्याचा प्रयत्न करतो. सरकार कोणतेही असो, त्याच्या धोरणांबाबत प्रश्न विचारणे ही लोकशाहीची नैसर्गिक प्रक्रिया आहे, याची जाणीव या पिढीला अधिक स्पष्टपणे होताना दिसते.

भारतीय लोकशाहीत प्रत्येक निवडणूक महत्त्वाची असते. मात्र काही निवडणुका केवळ सत्तांतरापुरत्या मर्यादित राहत नाहीत, तर त्या समाजाच्या विचारसरणीत होत असलेल्या बदलांचेही प्रतिबिंब ठरतात. २०२९ ची लोकसभा निवडणूक अशीच एक निवडणूक ठरू शकते का, हा प्रश्न आता गंभीरपणे विचारण्याची वेळ आली आहे. कारण आज भारतीय राजकारणात सर्वाधिक लक्ष वेधून घेणारा घटक म्हणजे बदलत चाललेली तरुण पिढी.

आज देशातील लाखो तरुणांसाठी सर्वात मोठी चिंता रोजगाराची आहे. पदवीधरांची संख्या वाढत असताना गुणवत्तापूर्ण नोकऱ्या त्याच वेगाने निर्माण होत आहेत का? स्पर्धा परीक्षांमधील पेपरफुटी, भरती प्रक्रियेतील विलंब, वारंवार होणाऱ्या परीक्षा रद्द आणि रिक्त सरकारी पदांचा प्रश्न हा केवळ प्रशासनिक त्रुटींचा विषय राहिलेला नाही; तो तरुणांच्या आयुष्याशी, मानसिक आरोग्याशी आणि सामाजिक विश्वासाशी जोडलेला प्रश्न बनला आहे. सरकारने यावर केवळ आश्वासने नव्हे तर मोजता येतील अशी परिणामकारक उत्तरे द्यायला हवीत.

याहून अधिक चिंताजनक बाब म्हणजे टीकेविषयीची वाढती असहिष्णुता. लोकशाहीत सरकारवर टीका करणे हा अधिकार आहे; उपकार नाहीत. पत्रकार, विद्यार्थी, कार्यकर्ते, प्राध्यापक किंवा विरोधी पक्षहे सर्व लोकशाहीच्या संवादाचा भाग आहेत. परंतु जेव्हा मतभिन्नतेला वारंवार राष्ट्रविरोधाशी जोडले जाते, तेव्हा सार्वजनिक चर्चेची जागा आकुंचन पावते. सरकारला अस्वस्थ करणारे प्रश्न विचारले जात आहेत, याचा अर्थ लोकशाही जिवंत आहे; ती धोक्यात आली आहे, असा नाही.

संस्थांच्या स्वायत्ततेबाबतचे प्रश्नही दुर्लक्षित करता येणार नाहीत. निवडणूक आयोग, तपास यंत्रणा, माहिती आयोग, विद्यापीठे आणि सार्वजनिक प्रसारमाध्यमे यांच्याबाबत समाजात निर्माण होणाऱ्या शंका ही केवळ विरोधकांची राजकीय भाषा म्हणून फेटाळता येत नाहीत. लोकशाहीत संस्थांवरील विश्वास हा तितकाच महत्त्वाचा असतो जितकी त्यांची औपचारिक रचना. जर नागरिकांना संस्था निष्पक्षपणे काम करत असल्याचा विश्वास उरला नाही, तर निवडणुका होऊनही लोकशाही कमकुवत होऊ शकते.

शेतकरी आंदोलनापासून विद्यार्थी आंदोलनांपर्यंतच्या अनुभवांनी एक गोष्ट स्पष्ट केली आहेलोक प्रश्न विचारत आहेत. प्रश्न एवढाच आहे की सत्ता ऐकते आहे का? संवादाची जागा उरली आहे का? संसद ही वादविवादाची संस्था आहे की केवळ संख्याबळ सिद्ध करण्याचे व्यासपीठ? बहुमत असणे महत्त्वाचे असते; पण बहुमतामुळे विरोधी मत अनावश्यक ठरत नाही

मात्र या प्रक्रियेत विरोधी पक्षांची भूमिकाही तितकीच महत्त्वाची आहे. जर युवक स्वतःच प्रश्न विचारत असतील, तर त्या प्रश्नांना धोरणात्मक दिशा देणे, पर्यायी उपाय मांडणे आणि जनतेसमोर विश्वासार्ह पर्याय उभा करणे ही विरोधी पक्षांची जबाबदारी आहे. केवळ सरकारवर टीका करणे किंवा संसदेतील गदारोळ पुरेसा ठरत नाही. लोकांना घोषणांपेक्षा ठोस कार्यक्रम, सातत्यपूर्ण जनसंपर्क आणि विश्वासार्ह नेतृत्व अपेक्षित असते. विरोधी पक्षांनीही या बदलत्या जनमानसाचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.

सत्ताधारी पक्ष आणि त्याच्याशी संबंधित विचारप्रवाहांबाबतही समाजात विविध मतप्रवाह आहेत. काहींच्या मते त्यांनी विकास आणि राष्ट्रीय हिताला प्राधान्य दिले आहे, तर काही जण सत्तेचे केंद्रीकरण, मतभिन्नतेबाबत असहिष्णुता किंवा संस्थांवरील प्रभाव यांसारख्या मुद्द्यांवर प्रश्न उपस्थित करतात. या दोन्ही भूमिका सार्वजनिक चर्चेचा भाग आहेत.

# पिंपरी-चिंचवडमधील १५ टक्के पाणी कपात तातडीने मागे घ्या; नागरिकांना शुद्ध पाणीपुरवठ्याचे निर्देश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरात लागू करण्यात आलेली १५ टक्के पाणी कपात तात्काळ मागे घेऊन नागरिकांना नियमित व शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करावा, असे निर्देश महापालिकेच्या स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे यांनी प्रशासनाला दिले. तसेच पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापन, धोकादायक झाडे, वीजपुरवठा, क्रीडा सुविधा आणि कचरा व्यवस्थापनाबाबतही विविध सूचना करण्यात आल्या.

महापालिकेची तहकूब व नियमित साप्ताहिक स्थायी समिती सभा कै. मधुकर पवळे सभागृहात सभापती अभिषेक बारणे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी सभेतील निर्णयांची माहिती दिली.

**पाणीपुरवठा आणि आपत्ती व्यवस्थापनावर भर**

शहरातील विविध भागांमध्ये पाणीपुरवठ्याबाबत तक्रारी येत असल्याने त्या तातडीने सोडवून नागरिकांना स्वच्छ आणि शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले. तसेच अतिवृष्टीमुळे धोकादायक ठरलेल्या झाडांचे सर्वेक्षण करून आवश्यक छाटणी करावी, झाडांभोवतीचे काँक्रीटीकरण हटवून त्यांची स्थिती तपासावी आणि संभाव्य अपघात टाळण्यासाठी उपाययोजना कराव्यात, असेही त्यांनी सांगितले.

**महावितरणशी समन्वयाचे आदेश**

पावसामुळे विद्युत डीपीमध्ये पाणी साचणे किंवा झाडांच्या फांद्या विद्युत तारा तुटण्याच्या घटना टाळण्यासाठी महापालिका आणि महावितरण यांच्यात प्रभावी समन्वय ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या. आवश्यक ठिकाणी फांद्या छाटण्यासाठी तातडीने परवानग्या देण्याचेही निर्देश देण्यात आले.

**डीएमएस प्रणाली पुन्हा कार्यान्वित**

महापालिकेतील नादुरुस्त डीएमएस (सॉफ्टवेअर) प्रणाली पुन्हा सुरू करण्यात आल्याची माहिती देत, बांधकाम विभागाशी संबंधित प्रलंबित कामे आता गतीने मार्गी लावण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्याचे बारणे यांनी सांगितले.

**क्रीडा धोरणाची अंमलबजावणी**

महापालिकेचे क्रीडा धोरण तातडीने लागू करून जिम, क्रीडांगणे, जलतरण तलाव आणि जॉगिंग पार्क नागरिकांसाठी नियमानुसार उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करण्याचे निर्देशही देण्यात आले.

**'कचरा डेपोमुक्त शहर' हे लक्ष्य**

शहर कचरा डेपोमुक्त करण्यासाठी क्षेत्रीय कार्यालय स्तरावरच कचऱ्यावर प्रक्रिया करण्याची योजना राबविण्यात येत असून, पुढील तीन महिन्यांत त्याचे सकारात्मक परिणाम दिसतील, असा विश्वास सभापती अभिषेक बारणे यांनी व्यक्त केला. तसेच देहूरोड आणि खडकी कॅन्टोन्मेंट बोर्डाचा कचराही प्रक्रिया करण्यात येत असल्याची माहिती त्यांनी दिली.

**मोशी दुर्घटनाग्रस्तांना मदतीची प्रक्रिया सुरू**

मोशी कचरा डेपो दुर्घटनेत मृत्यू झालेल्या कामगारांच्या वारसांना आर्थिक मदत देण्याची प्रक्रिया सुरू झाली असून, जखमी कामगारांनाही मदत आणि पुनर्वसनासाठी प्रशासनासोबत बैठक घेऊन निर्णय करण्यात येणार असल्याचे अभिषेक बारणे यांनी स्पष्ट केले.

## विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमासाठी मतदार मदत कक्ष सुरू; मार्गदर्शनासाठी '१९५०' हेल्पलाईन उपलब्ध

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे । प्रतिनिधी**

विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम (ड्खठ)-२०२६ अंतर्गत मतदारांना आवश्यक माहिती, मार्गदर्शन आणि सहाय्य उपलब्ध करून देण्यासाठी पुणे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने विधानसभा मतदारसंघनिहाय मदत कक्ष सुरू करण्यात आले आहेत. तसेच मतदारांच्या शंकांचे निरसन करण्यासाठी १९५० हेल्पलाईन क्रमांकही उपलब्ध करून देण्यात आला आहे.

पुणे जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे महानगरपालिका आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका येथे स्वतंत्र मदत कक्ष स्थापन करण्यात आले असून प्रत्येक विधानसभा मतदारसंघासाठी संपर्क अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयातील मदत कक्ष

जुन्नर, आंबेगाव, खेड-आळंदी, शिरूर, दौंड, इंदापूर, बारामती, पुरंदर, भोर, वेल्हा, मुळशी आणि मावळ या विधानसभा मतदारसंघांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयात मदत कक्ष कार्यरत आहेत.

**पिंपरी-चिंचवडमधील मदत कक्ष**

चिंचवड, पिंपरी आणि भोसरी या तीन विधानसभा मतदारसंघांसाठी पिंपरी-चिंचवड महापालिका येथे स्वतंत्र मदत कक्ष सुरू करण्यात आले आहेत.

**पुणे शहरातील मदत कक्ष**

वडगाव शेरी, शिवाजीनगर, कोथरूड, खडकवासला, पर्वती, हडपसर, पुणे कॅन्टोन्मेंट आणि कसबा पेठ या विधानसभा मतदारसंघांसाठी पुणे महानगरपालिकेत मदत कक्ष कार्यरत आहेत.

याशिवाय, जिल्हाधिकारी कार्यालयात राखीव मदत कक्षही स्थापन करण्यात आला असून आवश्यकतेनुसार नागरिकांना तेथूनही मार्गदर्शन केले जाणार आहे.

जिल्हा प्रशासनाने मतदारांना विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमासंदर्भातील माहिती, नाव पडताळणी, आवश्यक कागदपत्रे तसेच इतर शंकांसाठी संबंधित मदत कक्ष किंवा १९५० हेल्पलाईनवर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भाजप महिला मोर्चाचा अनोखा उपक्रम

## ४ हजार महिलांना मोफत 'किचन गार्डन किट'

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी - चिंचवड । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाच्या वतीने शहरी महिलांना गृह-कृषी आणि सेंद्रिय शेतीकडे प्रोत्साहन देण्यासाठी 'देवाभाऊ कृषी माऊली सोहळा' या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत पिंपरी-चिंचवड शहरातील सुमारे ४ हजार महिलांना मोफत 'किचन गार्डन किट' वितरित करण्यात येणार असून आधुनिक सेंद्रिय शेतीचे मार्गदर्शनही केले जाणार आहे.

भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली आणि भाजपा महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्षा आमदार चित्रा वाघ यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे, आमदार महेश लांडगे, आमदार शंकर जगताप, आमदार उमा खापरे, आमदार अमित गोरखे तसेच माजी युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली २४ जुलै २०२६ (शुक्रवार) रोजी सकाळी ग. दि. माडगूळकर प्रेक्षागृहाच्या लहान सभागृहात कार्यक्रम होणार असल्याची माहिती भाजपा महिला मोर्चाच्या शहराध्यक्षा सुजाता पालांडे यांनी दिली.

कार्यक्रमामध्ये शहरी भागातील महिलांना बाल्कनी, गच्ची किंवा मर्यादित जागेत विषमुक्त भाजीपाला कसा पिकवावा, याबाबत तज्ज्ञांकडून मार्गदर्शन केले जाणार आहे. यासाठी नामांकित नर्सरीचे तज्ज्ञ, हायड्रोपोनिक्स सल्लागार तसेच कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांचे विशेष मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले आहे. यावेळी प्रत्येक महिलेला पर्यावरणपूरक कापडी पिशवीमध्ये पाच प्रकारच्या उच्च दर्जाच्या भाजीपाल्याच्या बियाण्यांचे संच, सेंद्रिय खताची पिशवी आणि पाण्याचा स्प्रेअर असलेले 'किचन गार्डन किट' मोफत देण्यात येणार आहे.

महिला सक्षमीकरण, सेंद्रिय शेतीचा प्रसार आणि घरच्या घरी विषमुक्त भाजीपाला उत्पादनाला चालना देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत असून परिसरातील महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सुजाता पालांडे यांनी केले आहे.

## आयुक्त नागरिकांना निर्धारित वेळेत भेटत नसल्याचा आरोप; ३० जुलैला आंदोलनाचा इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी** : पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी हे नागरिकांना जाहीर केलेल्या निर्धारित वेळेत भेटत नसल्याचा आरोप करत त्यांच्या निषेधार्थ ३० जुलै २०२६ रोजी आयुक्त कार्यालयासमोर शांततापूर्ण आंदोलन करण्यात येणार असल्याची सूचना प्रशासनाला देण्यात आली आहे.

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी पदभार स्वीकारल्यानंतर प्रत्येक मंगळवार व गुरुवार सायंकाळी ४ ते ६ या वेळेत नागरिकांच्या भेटीसाठी वेळ राखून ठेवण्यात आल्याचे जाहीर केले होते. मात्र, पदभार स्वीकारल्यापासून आजपर्यंत या निर्धारित वेळेत सर्वसामान्य नागरिकांना प्रत्यक्ष भेट दिली जात नसल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर आयुक्त कार्यालयासमोर ३० जुलै रोजी शांततापूर्ण निदर्शने आंदोलन करण्यात येणार असल्याचे प्रशासनाला दिलेल्या लेखी सूचनेत म्हटले आहे.

तसेच महापालिका प्रशासनाने या आंदोलनाची नोंद घेऊन योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

## काळेवाडी कचरा संकलन केंद्राची स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांच्याकडून पाहणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या काळेवाडी येथील एम. एम. कॉलेजजवळील कचरा संकलन केंद्राची स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी गुरुवारी पाहणी करून तेथील घनकचरा व्यवस्थापनाच्या कामकाजाचा आढावा घेतला. भविष्यातील लोकसंख्या वाढ आणि वाढत्या कचऱ्याच्या प्रमाणाचा विचार करून घनकचरा व्यवस्थापनासाठी अधिक सक्षम व दीर्घकालीन नियोजन करण्याचे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले.

पाहणीदरम्यान बारणे यांनी शहरातून गोळा होणाऱ्या ओला व सुका कचऱ्याचे संकलन, वर्गीकरण, वैज्ञानिक पद्धतीने प्रक्रिया आणि अंतिम विल्हेवाट या संपूर्ण प्रक्रियेची माहिती घेतली. तसेच कचरा संकलन केंद्र परिसर आणि आजूबाजूच्या भागात स्वच्छता राखण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

शहराचा झपाट्याने विस्तार होत असून आगामी काळात कचऱ्याचे प्रमाण वाढणार असल्याने घनकचरा प्रक्रिया यंत्रणा अधिक कार्यक्षम आणि परिणामकारक ठेवण्यावर भर देण्याची गरज असल्याचे बारणे यांनी यावेळी नमूद केले. भविष्यातील गरजा लक्षात घेऊन नियोजनबद्ध पद्धतीने पायाभूत सुविधा विकसित करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

## सांगवी–किवळे मार्गावरील रक्षक चौकातील सबवे आणि महात्मा फुले पुलाखालील विरंगुळा प्रकल्पाचे लोकार्पण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी । प्रतिनिधी**




पिंपरी-चिंचवड शहरातील वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्यासोबतच नागरिकांना दर्जेदार नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने महापालिकेने साकारलेल्या दोन महत्त्वाच्या विकासकामांचे लोकार्पण आमदार शंकर जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. यामध्ये सांगवी-किवळे मार्गावरील रक्षक चौकातील व्हेईक्युलर अंडरपास (तणझ) तसेच सांगवी फाटा येथील महात्मा ज्योतिबा फुले पुलाखाली विकसित करण्यात आलेल्या बहुउद्देशीय विरंगुळा प्रकल्पाचा समावेश आहे.

सांगवी येथील महात्मा फुले उड्डाणपूलाखाली आयोजित कार्यक्रमाला ह प्रभाग अध्यक्षा तृप्ती कांबळे, शिक्षण समिती सभापती रविना आंघोळकर, नगरसदस्य ज्ञानेश्वर जगताप, शशिकांत कदम, शाम जगताप, नवनाथ जगताप, दीप्ती कांबळे, पल्लवी जगताप, शहर अभियंता मनोज सेठी, सहशहर अभियंता बापू गायकवाड, कार्यकारी अभियंता सुनील पवार, उपअभियंता चंद्रकांत मोरे तसेच परिसरातील नागरिक उपस्थित होते.

महात्मा ज्योतिबा फुले पुलाखालील मोकळ्या जागेचा प्रभावी वापर करून विकसित करण्यात आलेल्या बहुउद्देशीय विरंगुळा प्रकल्पात आकर्षक सुशोभीकरण, फिरण्यासाठी वॉकिंग ट्रॅक, बैठकीची व्यवस्था, व्यायामासाठी सुविधा, खुली जागा तसेच सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांसाठी आवश्यक परिसर उपलब्ध करून देण्यात आला आहे. पूर्वी दुर्लक्षित असलेल्या जागेचे लोकाभिमुख सार्वजनिक स्थळात रूपांतर झाल्याने परिसराच्या सौंदर्यात भर पडली असून नागरिकांना नव्या विरंगुळा केंद्राची सुविधा मिळाली आहे.

याचबरोबर शहरातील वाढत्या वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी सांगवी-किवळे मार्गावरील रक्षक चौक येथे उभारण्यात आलेल्या व्हेईक्युलर अंडरपासचेही लोकार्पण करण्यात आले. या प्रकल्पामुळे वाहतूक कोंडी कमी होऊन नागरिकांचा प्रवास अधिक सुलभ आणि सुरक्षित होण्यास मदत होणार असल्याचे महापालिकेने सांगितले.

या कार्यक्रमास ज प्रभाग अध्यक्षा आरती चोंधे, नगरसदस्य ॲड. विनायक गायकवाड, संदीप कस्पटे, नगरसदस्या स्नेहा कलाटे, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, सहशहर अभियंता प्रेरणा शिनकर, कार्यकारी अभियंता संध्या वाघ, कार्यकारी अभियंता विजय भोजने, उपअभियंता निलेश दाते तसेच महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आपत्ती व्यवस्थापनात समन्वय, तत्परता आणि पूर्वतयारीला प्राधान्य द्या : अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी : पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर संभाव्य आपत्कालीन परिस्थितीचा प्रभावी सामना करण्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांच्या अध्यक्षतेखाली आपत्ती व्यवस्थापनाचा आढावा घेण्यात आला. नागरिकांच्या जीवित व मालमत्तेचे संरक्षण हे प्रशासनाचे सर्वोच्च प्राधान्य असून, सर्व विभागांनी समन्वय, तत्परता आणि पूर्वतयारीच्या आधारे काम करावे, असे निर्देश त्यांनी दिले.

बैठकीत जंगम म्हणाले की, आपत्ती व्यवस्थापनात पूर्वनियोजन, विभागांतील प्रभावी समन्वय आणि तातडीचा प्रतिसाद ही यशस्वी व्यवस्थापनाची गुरुकिल्ली आहे. प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयाने उपलब्ध मनुष्यबळाचे नियोजन करून आपत्कालीन परिस्थितीत त्वरित प्रतिसाद देण्यासाठी सज्ज राहावे. क्षेत्रीय अधिकारी आणि कार्यकारी अभियंत्यांनी परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवून क्विक रिस्पॉन्स टीम (टढ) कार्यरत ठेवावी, असे त्यांनी सांगितले.

संभाव्य पूरस्थिती लक्षात घेऊन सखल भागांची नियमित पाहणी करावी, नागरिकांना वेळोवेळी सतर्क करावे आणि आवश्यकतेनुसार शाळा किंवा सार्वजनिक इमारतींमध्ये निवारा केंद्रे तयार ठेवावीत. या केंद्रांमध्ये स्वच्छता, पिण्याचे पाणी, वीज, स्वच्छतागृहे आणि इतर मूलभूत सुविधा उपलब्ध असल्याची खात्री करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

आरोग्य विभागाने क्षेत्रनिहाय स्वतंत्र वैद्यकीय पथके तयार करून आवश्यक औषधसाठा, वैद्यकीय साहित्य आणि मनुष्यबळ उपलब्ध ठेवावे. पुनर्वसनासाठी आवश्यक वाहने सज्ज ठेवण्याबरोबरच पाणी साचणाऱ्या भागांमध्ये तातडीने पाण्याचा उपसा करण्यासाठी आवश्यक क्षमतेचे पंप कार्यरत ठेवण्याचे निर्देश संबंधित विभागांना देण्यात आले.

धोकादायक ठिकाणी त्वरित कारवाई करता यावी यासाठी स्थापत्य विभागाने आवश्यक त्या ठिकाणी जेसीबी यंत्रसामग्री उपलब्ध ठेवावी.

तसेच 'आपदा मित्र' स्वयंसेवक पथकाशी सातत्याने समन्वय राखून त्यांच्या सहभागातून आपत्ती व्यवस्थापन अधिक प्रभावी करावे. सर्व विभागांनी आपल्या जबाबदाऱ्यांनुसार पूर्वतयारी पूर्ण करून कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना तातडीने मदत मिळेल, यासाठी यंत्रणा चोवीस तास सज्ज ठेवाव्यात, असेही जंगम यांनी स्पष्ट केले.

या बैठकीस मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, सहशहर अभियंते अजय सूर्यवंशी व अनिल भालसाखळे, उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल, अण्णा बोदडे, व्यंकटेश दुर्वास, सीताराम बहुरे, राजेश आंगळे, विविध क्षेत्रीय अधिकारी, सहाय्यक आयुक्त, कार्यकारी अभियंते तसेच महापालिकेच्या विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### पहिल्याच पुराचा २४ कोटींच्या पुलाला बसला तडाखा; गुणवत्तेवरच प्रश्नचिन्ह

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी/उरुळी कांचन**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) माध्यमातून हवेली तालुक्यातील हिंगणगाव ते खामगाव टेक जोडणाऱ्या नदीवरील सुमारे २४ कोटी रुपये खर्चाच्या पुलाच्या बांधकामावर पहिल्याच पुरात प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मुसळधार पावसानंतर आलेल्या पुराच्या पाण्यात पुलाचा काही भाग कोसळल्याचा दावा करण्यात आला असून, स्लॅब आणि पिलरचे नुकसान झाल्याने कामाच्या गुणवत्तेबाबत गंभीर शंका उपस्थित करण्यात येत आहे. या घटनेनंतर शिवसेनेचे युवा नेते अलंकार बाळासाहेब कांचन-पाटील यांनी घटनास्थळी भेट देऊन तीव्र नाराजी व्यक्त केली. त्यांनी या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषी ठेकेदार आणि संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. अलंकार कांचन-पाटील यांनी सांगितले की, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे आणि स्थानिक ग्रामस्थांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांतून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यकाळात या पुलास मंजुरी मिळाली होती. पीएमआरडीएमार्फत हे काम मे. टी. अँड टी. इन्फ्रा लि., पुणे या कंपनीकडे देण्यात आले होते. रस्ता आणि जोडणीचे काम पूर्ण होण्यापूर्वीच आलेल्या पुराच्या पाण्यामुळे पुलाचा काही भाग कोसळला. त्यामुळे कोट्यवधी रुपयांच्या या प्रकल्पाच्या बांधकामाच्या गुणवत्तेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत.

ठेकेदारी व्यवस्थेवर टीका करत अलंकार पाटील म्हणाले, 'टक्केवारीच्या चक्रामुळे विकासकामांच्या गुणवत्तेवर परिणाम होत असून, जनतेच्या पैशांची उधळपट्टी केली जात आहे.' घटना घडूनही संबंधित अधिकारी किंवा ठेकेदारांनी घटनास्थळी भेट दिली नसल्याबद्दलही त्यांनी नाराजी व्यक्त केली. या संपूर्ण प्रकरणाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

या घटनेनंतर पुलाच्या उभारणीतील तांत्रिक बाबींची तपासणी करण्याची मागणी होत आहे. सार्वजनिक निधीतून उभारण्यात येणाऱ्या महत्त्वाच्या पायाभूत प्रकल्पांमध्ये दर्जेदार कामे होणे अपेक्षित असताना, बांधकाम सुरू असतानाच गर्डर कोसळल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

# मांदळेवाडीत बिबट्याचा वाढता वावर; शेतकरी व ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी । प्रतिनिधी**

आंबेगाव तालुक्यातील मांदळेवाडी येथे गेल्या काही दिवसांपासून बिबट्याचा वावर वाढल्याने शेतकरी आणि ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. उंबरखोरी परिसरात बुधवारी (दि. २२) रात्री बिबट्या रस्त्यालगत बसलेला दिसल्याने नागरिकांमध्ये घबराट पसरली.

मिळालेल्या माहितीनुसार, अतुल मांदळे आणि संतोष आदक हे मंचर येथून भाजी विक्री करून रात्री सुमारे १० वाजण्याच्या सुमारास चारचाकी वाहनातून मांदळेवाडीकडे परतत होते. उंबरखोरी परिसरात रस्त्यालगत बिबट्या बसलेला दिसताच त्यांची चांगलीच तारांबळ उडाली. वाहनात असूनही समोर अचानक बिबट्या दिसल्याने त्यांच्यामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.

सध्या पावसाळ्यामुळे शेतकरी शेतीच्या कामात व्यस्त आहेत. तसेच उंबरखोरी परिसरात दररोज शेळ्या, मेंढ्या आणि इतर जनावरे चरण्यासाठी आणली जात असल्याने बिबट्याच्या



वाढत्या वावरामुळे ग्रामस्थांची चिंता वाढली आहे.

या पार्श्वभूमीवर वनविभागाने तातडीने या परिसरात पिंजरा लावून बिबट्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

उपसरपंच रवि ढगे पाटील, ॲड. अशोक पालेकर पाटील तसेच शेतकरी व ग्रामस्थांनी वनविभागाने एखादी अनुचित घटना घडण्याची वाट न पाहता त्वरित प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे.

दरम्यान, बिबट्या आढळल्यास किंवा त्याचा वावर दिसून आल्यास तात्काळ वनविभागाला माहिती देण्याचे आवाहन वनविभागाने नागरिकांना केले आहे.

## खडकवाडीत धोकादायक फ्यूज पेट्यांची तातडीने दुरुस्ती; वृत्ताची दखल घेत महावितरणची कारवाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी । प्रतिनिधी**

आंबेगाव तालुक्यातील खडकवाडी गावातील गावठाण परिसरात धोकादायक अवस्थेत असलेल्या महावितरणच्या फ्यूज पेट्यांबाबत दैनिक राज्य लोकतंत्रने वृत्त प्रसिद्ध केले होते. या वृत्ताची दखल घेत महावितरण प्रशासनाने तातडीने दुरुस्तीची कामे हाती घेत ती पूर्ण केली आहे.

खराब झालेल्या फ्यूज पेट्यांची आवश्यक दुरुस्ती करून वीज यंत्रणा सुरक्षित करण्यात आली. त्यामुळे संभाव्य अपघाताचा धोका टळल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे. ग्रामस्थांनी व्यक्त केलेल्या चिंतेची गांभीर्याने दखल घेत त्वरित कार्यवाही केल्याबद्दल महावितरण प्रशासनाचे नागरिकांनी आभार मानले.

याबाबत माजी सरपंच अनिल डोके म्हणाले, ग्रामस्थांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने फ्यूज पेट्यांची दुरुस्ती अत्यंत आवश्यक होती. महावितरण प्रशासनाने तात्काळ प्रतिसाद देत जबाबदारीची जाणीव ठेवून काम पूर्ण केले. स्थानिक समस्येला दैनिक राज्य लोकतंत्रने वाचा फोडल्यामुळे ही कार्यवाही वेगाने झाली.

यापुढेही गावातील विद्युत यंत्रणांची



नियमित तपासणी करून वेळोवेळी देखभाल करण्यात यावी, अशी अपेक्षा माजी सरपंच अनिल डोके आणि ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

# 'इन्कलाब जिंदाबाद, आझादी लेकर रहेंगे'

## पिंपरीत हजारो विद्यार्थ्यांचा एल्गार, दिल्लीतील आंदोलनाला पाठिंबा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी । प्रतिनिधी**

नीट पेपरफुटीसह विविध स्पर्धा परीक्षांतील कथित गैरकारभाराच्या विरोधात दिल्ली येथे सुरू असलेल्या विद्यार्थीआंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने गुरुवारी (दि. २३) पिंपरीत आंदोलन करण्यात आले. दिल्लीतील आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित पोलिस कारवाईचाही निषेध यावेळी व्यक्त करण्यात आला. वंचित बहुजन आघाडीचे संस्थापक अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी दिलेल्या राज्यव्यापी बंदच्या हाकेला प्रतिसाद देत डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक (भीम सृष्टी) येथे मोठ्या संख्येने कार्यकर्ते आणि विद्यार्थी सहभागी झाले आहेत.




सकाळपासून पिंपरी परिसरातून रॅली काढण्यात आली. त्यानंतर भीम सृष्टी येथे ठिय्या आंदोलन सुरू करण्यात आले. आंदोलनस्थळी विद्यार्थ्यांनी परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता आणावी, पेपरफुटी आणि कथित गैरव्यवहाराची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच विद्यार्थ्यांच्या भविष्याशी होणारा खेळ थांबवावा, अशी मागणी केली. दिवसभर सुरू असलेल्या पावसाची पर्वा न करता विद्यार्थी आणि वंचितचे कार्यकर्ते आंदोलनस्थळी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहिले. ''इन्कलाब जिंदाबाद'', ''आझादी लेकर रहेंगे'', ''धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा झालाच पाहिजे'' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करत केंद्र सरकारने स्पर्धा परीक्षांतील कथित गैरप्रकारांबाबत कठोर भूमिका घ्यावी आणि विद्यार्थ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी केली.

# ओतूर बसस्थानकाच्या विकासाला मुहूर्त सापडेना; घाणीचे साम्राज्य, दुर्गंधीमुळे प्रवासी हैराण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ओतूर । प्रतिनिधी**

शिवजन्मभूमी जुन्नर तालुक्यातील आणि कल्याण-अहिल्यानगर महामार्गावरील महत्त्वाचे बसस्थानक म्हणून ओळख असलेल्या ओतूर बसस्थानकाची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत असून, अपुऱ्या सुविधांमुळे प्रवाशांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. बसस्थानक परिसरात सर्वत्र अस्वच्छता, दुर्गंधी, अपुरी बैठक व्यवस्था, गळके छत आणि पावसाळ्यात साचणारे पाणी यामुळे प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.




दररोज शेकडो प्रवासी आणि विविध जिल्ह्यांतील लांब पल्ल्याच्या एसटी बस तसेच स्थानिक शटल सेवा या बसस्थानकावरून ये-जा करतात. मात्र वाढत्या प्रवासी संख्येच्या तुलनेत बसस्थानकातील सुविधा अत्यंत अपुऱ्या पडत आहेत. बसस्थानक उभारल्यानंतर आजपर्यंत कोणतेही मोठे नूतनीकरण झाले नसल्याने बैठक व्यवस्था अपुरी असून अनेक प्रवाशांना उभे राहून बसची प्रतीक्षा करावी लागते.

उन्हाळ्यात कडक उन्हाचा तर पावसाळ्यात गळक्या छताचा त्रास सहन करावा लागतो. पावसाचे पाणी बसस्थानक परिसरात साचल्याने मोठे खड्डे पाण्याने भरून जातात आणि अक्षरशः डोह निर्माण होतात. त्यामुळे पादचाऱ्यांसह वाहनचालकांनाही अडचणींचा सामना करावा लागतो. ओतूर बसस्थानकातून परभणी, बसमत, छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, अहिल्यानगर, बीड, लातूर, जालना, श्रीरामपूर, संगमनेर, अकोले, शिर्डी, पंढरपूर, पारनेर, शिरूर, तसेच ठाणे, कल्याण, भिवंडी, वसई, पालघर, पनवेल, मुंबई आदी भागांसाठी एसटी सेवा उपलब्ध आहे. याशिवाय तालुक्यातील स्थानिक शटल सेवांचाही मोठ्या प्रमाणावर वापर होतो. त्यामुळे या बसस्थानकाचे आधुनिकीकरण करण्याची मागणी जोर धरत आहे. प्रवाशांच्या म्हणण्यानुसार, या मार्गावरून दररोज सुमारे ९७ एसटी बसेस धावतात. मात्र बसस्थानकावर केवळ एकच वाहतूक नियंत्रक कार्यरत असल्याने रात्रीच्या वेळेत कोणतीही व्यवस्था राहत नाही. दिवसा आणि रात्री स्वतंत्र वाहतूक नियंत्रक नियुक्त करावेत, तसेच नियमित स्वच्छतेसाठी सफाई कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी, अशी मागणी होत आहे. याशिवाय महामार्ग आणि स्थानिक मार्गावर धावणाऱ्या अनेक जुन्या व नादुरुस्त बसांमुळे प्रवाशांमध्ये अपघाताची भीती कायम आहे. या कालबाह्य बसांच्या जागी नवीन किंवा सुस्थितीतील बसेस उपलब्ध करून द्याव्यात, अशीही मागणी करण्यात येत आहे. तीन वर्षांपूर्वी ओतूर येथून पुण्यासाठी मुक्कामी एसटी सेवा उपलब्ध होती. या गाडीचा लाभ विद्यार्थी, नोकरदार आणि रुग्णांना मोठ्या प्रमाणावर होत होता. मात्र ही सेवा अचानक बंद करण्यात आली. वारंवार पाठपुरावा करूनही ती अद्याप सुरू झालेली नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे. या सर्व समस्यांबाबत परिवहन विभागाकडे अनेकदा पत्रव्यवहार करण्यात आला आहे. जुन्नर तालुक्यातील इतर बसस्थानकांचे आधुनिकीकरण झाले असताना ओतूर बसस्थानकाच्या विकासाला अद्याप मुहूर्त का मिळत नाही, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. प्रवाशांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असलेले हे बसस्थानक तातडीने अद्ययावत करून आवश्यक सुविधा उपलब्ध कराव्यात, अशी जोरदार मागणी परिसरातून होत आहे.

## शिरूरमध्ये शांततापूर्ण 'लाँग मार्च'; नीट विद्यार्थ्यांना न्यायाची मागणी, शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याचीही मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**शिरूर । प्रतिनिधी**

नीट परीक्षेतील कथित अनियमिततेच्या निषेधार्थ तसेच विद्यार्थ्यांना न्याय मिळावा, शिक्षण व्यवस्थेत पारदर्शकता आणि उत्तरदायित्व सुनिश्चित करावे, या मागण्यांसाठी शिरूर शहरात गुरुवारी विविध सामाजिक, शैक्षणिक आणि व्यावसायिक संघटनांच्या वतीने शांततापूर्ण 'लाँग मार्च' काढण्यात आला.

या मोर्चात महाविद्यालयीन युवक-युवती, महिला, डॉक्टर, व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. हातात फलक आणि घोषवाक्ये घेऊन सहभागी नागरिकांनी नीट परीक्षेतील कथित गैरव्यवहाराची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली. तसेच विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी तडजोड करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणीही करण्यात आली.

मोर्चादरम्यान काही आंदोलकांनी केंद्रीय शिक्षणमंत्र्यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, अशीही मागणी केली. शिक्षण व्यवस्थेवरील विद्यार्थ्यांचा आणि पालकांचा विश्वास अबाधित ठेवण्यासाठी पारदर्शक व निष्पक्ष परीक्षा प्रणाली राबविण्याची गरज असल्याचे मत सहभागींकडून व्यक्त करण्यात आले.

या शांततापूर्ण आंदोलनातून विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांकडे केंद्र सरकारने आणि संबंधित यंत्रणांनी गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी अपेक्षा आंदोलकांनी व्यक्त केली.

## पिंपळे सौदागरमध्ये पालिकेचा सावळागोंधळ; ५ वेळा दुरुस्ती करूनही चेंबर फुटलेलेच, नागरिक आक्रमक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपळे सौदागर । प्रतिनिधी**

पिंपळे सौदागर परिसरात महापालिकेच्या स्थापत्य आणि उद्यान विभागाच्या कथित निष्काळजी कारभाराचा फटका नागरिकांना बसत असल्याचा आरोप स्थानिक रहिवाशांनी केला आहे. एकाच पावसाळ्यात संबंधित विभागाने एका चेंबरची तब्बल पाच वेळा दुरुस्ती केली, मात्र तरीही चेंबर पुन्हा फुटल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

वारंवार दुरुस्ती करूनही समस्या कायम असल्याने कामाच्या दर्जाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. निकृष्ट दर्जाच्या कामामुळे सार्वजनिक निधीचा अपव्यय होत असल्याचा आरोपही नागरिकांकडून करण्यात येत आहे. या चेंबरमुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला असून, पावसाळ्यात अपघाताची शक्यता वाढल्याची चिंता स्थानिकांनी व्यक्त केली आहे. संबंधित विभागाने तात्पुरत्या उपाययोजनांऐवजी कायमस्वरूपी तोडगा काढावा, अशी मागणी रहिवाशांनी केली आहे.

महापालिका प्रशासनाने या समस्येकडे तातडीने लक्ष न दिल्यास आणि दोषी ठेकेदार तसेच संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई न केल्यास तीव्र जनआंदोलन छेडण्याचा इशारा स्थानिक नागरिकांनी दिला आहे.

दरम्यान, या प्रकरणाबाबत महापालिका प्रशासनाची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही. ती प्राप्त झाल्यानंतर तीही प्रसिद्ध करण्यात येईल.

# मल्चिंग पेपरवर वालवडीची भरघोस लागवड; युवा शेतकरी सुजित लोखंडे यांचा आधुनिक शेतीचा आदर्श

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव (आंबेगाव) :** आंबेगाव तालुक्यातील पारगाव येथील प्रगतशील युवा शेतकरी सुजित लोखंडे यांनी आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा अवलंब करत मल्चिंग पेपरवर सेंद्रिय पद्धतीने वालवडीची यशस्वी लागवड केली आहे. सध्या या पिकाची तोडणी सुरू असून भरघोस उत्पादनासह बाजारातही समाधानकारक दर मिळत असल्याने त्यांच्या प्रयोगाची परिसरात चर्चा होत आहे.

लोखंडे यांनी पारंपरिक शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत वालवडीच्या लागवडीसाठी मल्चिंग पेपरचा वापर केला. त्यामुळे जमिनीतील ओलावा टिकून राहिला, तणांचे प्रमाण कमी झाले आणि पिकाची वाढ जोमदार झाली. तसेच सेंद्रिय खतांचा वापर केल्याने पिकाची गुणवत्ता सुधारली असून आकर्षक व दर्जेदार शेंगा तयार झाल्या आहेत.

सध्या सुरू असलेल्या तोडणीतून चांगले उत्पादन मिळत असून बाजारातही समाधानकारक दर मिळत असल्याने हा प्रयोग आर्थिकदृष्ट्याही फायदेशीर ठरत आहे. कमी खर्चात अधिक उत्पादन मिळवण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान आणि नियोजनबद्ध



शेती किती महत्त्वाची आहे, हे सुजित लोखंडे यांनी आपल्या प्रयोगातून दाखवून दिले आहे.

सुजित लोखंडे हे केवळ स्वतःच्या शेतात नवनवीन प्रयोग करणारे शेतकरी नसून परिसरातील युवा शेतकऱ्यांनाही आधुनिक शेती, सेंद्रिय शेती, ठिबक सिंचन, मल्चिंग, पीक नियोजन आणि बाजारपेठ व्यवस्थापनाबाबत सातत्याने मार्गदर्शन करतात. त्यांच्या प्रेरणेने अनेक तरुण आधुनिक शेतीकडे वळत असून शेतीकडे व्यवसायाच्या दृष्टीने पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन विकसित होत आहे.

आधुनिक तंत्रज्ञान, सेंद्रिय शेती आणि नियोजनबद्ध व्यवस्थापन यांची योग्य सांगड घातल्यास शेती अधिक उत्पादनक्षम आणि फायदेशीर ठरू शकते, याचे उत्तम उदाहरण सुजित लोखंडे यांच्या वालवडीच्या शेतीतून पाहायला मिळत आहे. त्यांच्या या यशस्वी प्रयोगाचे परिसरातील शेतकऱ्यांकडून कौतुक होत असून अनेक शेतकरी त्यांच्या शेताला भेट देऊन आधुनिक लागवड तंत्राची माहिती घेत आहेत.

## सारांश वृत्त

### आता बेंगळुरू-मुंबई वंदे भारत स्लीपरची नवी मागणी!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बंगळुरु । प्रतिनिधी**

कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री आणि बेलगावीचे खासदार जगदीश शेट्टर यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन बेंगळुरू-मुंबई वंदे भारत स्लीपर रेल्वे सुरू करण्याची मागणी केली आहे. या मार्गामुळे तुमकुरू, दावणगेरे, हुबळी-धारवाड, बेळगाव आणि मुंबईदरम्यान प्रवास करणाऱ्या हजारो प्रवाशांना फायदा होईल, असा त्यांचा दावा आहे.

मात्र या मागणीमुळे पुन्हा एकदा रेल्वेच्या प्राधान्यक्रमावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सरकारकडून अत्याधुनिक आणि वेगवान वंदे भारत गाड्यांची घोषणा होत असताना, देशातील अनेक सामान्य एक्सप्रेस गाड्या अजूनही विलंब, प्रचंड गर्दी, अपुरी प्रतीक्षा यादी व्यवस्थापन, स्वच्छतेचा अभाव आणि सुरक्षा समस्यांशी झुंज देत आहेत.

विरोधकांचा आरोप आहे की, नवीन वंदे भारत गाड्यांच्या घोषणांना विकासाचे प्रतीक म्हणून मांडले जात असले, तरी विद्यमान रेल्वे पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण, ट्रॅक क्षमता वाढवणे आणि सामान्य प्रवाशांच्या मूलभूत अडचणी सोडवण्यावर अपेक्षित भर दिसत नाही.

जर बेंगळुरू-मुंबई वंदे भारत स्लीपर सेवा सुरू झाली, तर ती पश्चिम आणि दक्षिण भारतातील महत्त्वाच्या औद्योगिक शहरांना जोडणारा एक महत्त्वाचा दुवा ठरू शकते. मात्र तज्ज्ञांचे मत आहे की नवीन प्रीमियम गाड्या सुरू करण्याबरोबरच, विद्यमान रेल्वे नेटवर्क अधिक सुरक्षित, वेळेवर आणि सर्वसामान्यांसाठी सक्षम करणे हीदेखील सरकारची तितकीच महत्त्वाची जबाबदारी आहे.

# ब्रिटनच्या नव्या सत्तेचा मोठा संदेश; भारतीय वंशाचे कनिष्क नारायण कॅबिनेटमध्ये, स्टार्मर समर्थकांना डच्चू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लंडन । प्रतिनिधी :** ब्रिटनचे नवे पंतप्रधान अँडी बर्नहॅम यांनी सत्तेची सूत्रे हाती घेतल्यानंतर अवघ्या काही तासांत मंत्रिमंडळाची पुनर्रचना करत मोठे राजकीय संकेत दिले आहेत. त्यांनी भारतीय वंशाचे खासदार कनिष्क नारायण यांची कृत्रिम बुद्धिमत्ता (अख) मंत्री म्हणून कॅबिनेटमध्ये बढती केली आहे. त्याचबरोबर माजी पंतप्रधान कीर स्टार्मर यांच्या निकटवर्तीय मानल्या जाणाऱ्या अनेक मंत्र्यांना सरकारमधून बाहेरचा रस्ता दाखवत नव्या नेतृत्वाची स्पष्ट छाप उमटवली आहे.

२० जुलै २०२६ रोजी राजा चार्ल्स तिसरे यांनी अँडी बर्नहॅम यांना सरकार स्थापन करण्यासाठी निमंत्रित केल्यानंतर त्यांनी तातडीने नव्या मंत्रिमंडळाची घोषणा केली. या फेरबदलात कनिष्क नारायण यांना अख क्षेत्राची जबाबदारी देण्यात आली असून, त्यांनी आपल्या नियुक्तीला पंतप्रधानांच्या कृत्रिम बुद्धिमत्तेबाबतच्या दृढ बांधिलकीचे प्रतीक असे संबोधले आहे.

कनिष्क नारायण यांनी २०२४ च्या सार्वत्रिक निवडणुकीत वेल्समधून निवडून येत त्या प्रदेशाचे पहिले भारतीय वंशाचे खासदार होण्याचा मान मिळवला होता. आता त्यांची कॅबिनेटमध्ये झालेली बढती ही केवळ वैयक्तिक यशाची बाब नसून, ब्रिटनमधील भारतीय वंशाच्या समुदायाच्या वाढत्या राजकीय प्रभावाचेही प्रतीक मानली जात आहे.

दरम्यान, भारतीय वंशाच्या



आणखी एका वरिष्ठ नेत्या लिसा नँडी यांनीही मंत्रिमंडळातील आपले स्थान कायम राखले आहे. त्यांच्याकडे डिजिटल, संस्कृती, मीडिया आणि क्रीडा विभागाच्या सचिवपदासह अतिरिक्त जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या आहेत.

नव्या मंत्रिमंडळातील फेरबदलातून बर्नहॅम यांनी एकाच वेळी दोन स्पष्ट संदेश दिल्याचे राजकीय विश्लेषकांचे मत आहेपहिला, अख आणि डिजिटल अर्थव्यवस्थेला सरकारच्या धोरणाच्या केंद्रस्थानी ठेवण्याचा निर्धार; आणि दुसरा, माजी नेतृत्वाशी संबंधित गटबाजीला पूर्णविराम देत स्वतःची स्वतंत्र टीम उभी करण्याचा प्रयत्न. ब्रिटनमधील हा बदल भारतासाठीही महत्त्वाचा मानला जात आहे. अख, तंत्रज्ञान, शिक्षण आणि व्यापार या क्षेत्रांमध्ये भारत-ब्रिटन सहकार्य वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, भारतीय वंशाच्या मंत्र्यांच्या वाढत्या प्रभावामुळे दोन्ही देशांतील संबंधांना नवी दिशा मिळू शकते.

## रुपयावर पुन्हा दबाव; तेल १०० डॉलरच्या उंबरठ्यावर, अर्थव्यवस्थेसमोर नवे संकट?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई । प्रतिनिधी**

मध्य पूर्वेतील वाढत्या भू-राजकीय तणावामुळे जागतिक कच्च्या तेलाच्या किमती पुन्हा वेगाने वाढत असून, त्याचा थेट परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर दिसू लागला आहे. गुरुवारी भारतीय रुपया अमेरिकन डॉलरच्या तुलनेत ९६.५७ प्रति डॉलर या पातळीवर जवळपास स्थिर बंद झाला. मात्र तो गेल्या दोन महिन्यांतील सर्वात कमकुवत स्तराच्या जवळ असल्याने बाजारात चिंता व्यक्त केली जात आहे.

व्यापाऱ्यांच्या मते, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या (ठइख) हस्तक्षेपामुळे रुपयातील घसरण काही प्रमाणात रोखली गेली. सरकारी बँकांकडून डॉलरची विक्री करण्यात आल्याचे संकेत मिळाले असून, हा हस्तक्षेप आरबीआयच्या वतीने झाल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, ब्रेंट क्रूडचा भाव ४ टक्क्यांनी वाढून ९८ डॉलर प्रति बॅरलच्या पुढे गेला असून, तो १०० डॉलरच्या मानसिक टप्प्याच्या उंबरठ्यावर पोहोचला आहे. येमेनमधील हूती बंडखोरांनी दोन सौदी तेलवाहू जहाजांवर हल्ला केल्याचा दावा केल्यानंतर जागतिक तेलपुरवठ्याबाबतच्या चिंतेत भर पडली आहे.

अर्थतज्ज्ञांच्या मते, कच्च्या तेलाच्या वाढत्या किमती भारतासाठी महागाई वाढणे, आर्थिक वाढीचा वेग मंदावणे आणि चालू खात्यावरील तूट (उींअॅशपीं अलर्लेीपीं ऱ्शषळलळीं) वाढणे अशी तिहेरी जोखीम निर्माण करू शकतात. याशिवाय परदेशी गुंतवणूकदारांकडून भांडवली बाजारातून पैसा बाहेर जाण्याची शक्यताही वाढत आहे.

## निसर्गाचा इशारा, प्रशासनाची खरी परीक्षा; जम्मू-काश्मीरमधील ६५४ गावे धोक्याच्या छायेत!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जम्मू । प्रतिनिधी**

जम्मू-काश्मीरमध्ये सलग चौथ्या दिवशी सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे. नद्या आणि ओढे दुथडी भरून वाहत असून, अनेक ठिकाणी भूस्खलनाच्या घटना घडत आहेत. राज्य प्रशासनाने ६५४ गावे अतिधोकादायक म्हणून ओळखली असून, सुमारे ७.२२ लाख नागरिक संभाव्य आपत्तीच्या छायेत असल्याची माहिती दिली आहे.

सरकारच्या म्हणण्यानुसार, खबरदारीचा उपाय म्हणून १,५०५ नागरिकांना सुरक्षित बचाव केंद्रांमध्ये हलविण्यात आले आहे, तर इतर संवेदनशील भागांसाठीही स्थलांतराची तयारी सुरू आहे. पुढील २४ तासांतही मुसळधार पावसाचा इशारा असल्याने प्रशासनाने सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

मात्र प्रत्येक पावसाळ्यात अशाच प्रकारे शेकडो गावे धोकादायक घोषित केली जात असतील, तर पूरनियंत्रण, भूस्खलन प्रतिबंधक उपाय, नदी व्यवस्थापन आणि हवामान बदलाशी जुळवून घेणाऱ्या पायाभूत सुविधांवर दीर्घकालीन गुंतवणूक नेमकी कितपत झाली आहे? हा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

आपत्तीच्या वेळी बचावकार्य महत्त्वाचे असतेच; पण वारंवार त्याच भागातील नागरिकांना स्थलांतर करावे लागणे हे केवळ नैसर्गिक संकटाचे नव्हे, तर दीर्घकालीन नियोजनातील मर्यादांचेही द्योतक मानले जाते, असे आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रातील तज्ज्ञ वारंवार अधोरेखित करतात.

# महाराष्ट्र बंदपूर्वी 3,५०० व्हीबीए कार्यकर्ते ताब्यात?; प्रकाश आंबेडकरांचा गंभीर आरोप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई । प्रतिनिधी :** वंचित बहुजन आघाडीचे (तइअ) अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी गुरुवारी, २३ जुलै रोजी राज्यव्यापी बंदपूर्वी पक्षाचे सुमारे ३,५०० कार्यकर्ते पोलिसांनी ताब्यात घेतल्याचा दावा केला आहे. या कारवाईमुळे राज्यातील राजकीय वातावरण तापले असून, बंदच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांनी विविध ठिकाणी प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्याची माहिती समोर येत आहे.

वंचित बहुजन आघाडीने केंद्र सरकारच्या शिक्षण धोरणाविरोधात तसेच दिल्लीतील विद्यार्थी आणि आंदोलकांवर झालेल्या कथित पोलिस कारवाईच्या निषेधार्थ महाराष्ट्र बंदची हाक दिली आहे. या बंदला विविध सामाजिक संघटना आणि काही विद्यार्थी संघटनांनीही



पाठिंबा दर्शविल्याचे वृत्त आहे.

प्रकाश आंबेडकर यांनी मोठ्या प्रमाणावर कार्यकर्त्यांना ताब्यात घेण्यात आल्याचा आरोप करत, ही कारवाई लोकशाही हक्कांवर गदा आणणारी असल्याचे म्हटले आहे. दरम्यान, या दाव्याबाबत पोलिस प्रशासनाकडून अधिकृत आणि सविस्तर प्रतिक्रिया अद्याप समोर आलेली नाही.

राज्यात बंदच्या पार्श्वभूमीवर संवेदनशील भागांत अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून, नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत सूचनांचे पालन करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# राष्ट्रीय क्रीडा मंडळाच्या स्थापनेला पुन्हा विलंब; अर्जांची मुदत वाढवली

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

देशातील क्रीडा प्रशासनात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या राष्ट्रीय क्रीडा मंडळ (छीऀळेपरश्न डेंऑी ढ्रेऑव - छड्ड) स्थापनेला पुन्हा विलंब होणार आहे. क्रीडा मंत्रालयाने अध्यक्ष आणि सदस्यांच्या निवडीसाठी अर्ज सादर करण्याची मुदत १५ दिवसांनी वाढवण्याचा निर्णय घेतला असून, त्यामुळे मंडळाच्या स्थापनेची प्रक्रिया आणखी लांबणार आहे.

क्रीडा मंत्रालयाने जारी केलेल्या परिपत्रकानुसार, अर्ज सादर करण्याची मूळ मुदत २२ जुलै २०२६ रोजी संपुष्टात आली होती. मात्र इच्छुकांकडून अधिक प्रतिसाद मिळावा आणि निवड प्रक्रिया व्यापक व्हावी या उद्देशाने ऑनलाइन अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत ६ ऑगस्ट २०२६ रोजी रात्री ८ वाजेपर्यंत वाढविण्यात आली आहे.

राष्ट्रीय क्रीडा मंडळाच्या अध्यक्ष आणि सदस्यांची नियुक्ती कॅबिनेट सचिव टी. व्ही. सोमनाथन यांच्या अध्यक्षतेखालील शोध व निवड समितीच्या शिफारशींवर केली जाणार आहे. या समितीत ऑलिम्पिक कांस्यपदक विजेते नेमबाज गगन नारंग आणि माजी आंतरराष्ट्रीय वेटलिफ्टर एन. कुंजाराणी देवी यांच्यासह एकूण पाच सदस्यांचा समावेश आहे.

राष्ट्रीय क्रीडा धोरणाच्या अंमलबजावणीसाठी महत्त्वाचे मानले जाणारे हे मंडळ अद्याप अस्तित्वात न आल्याने, त्याच्या स्थापनेकडे क्रीडा क्षेत्राचे लक्ष लागले आहे. अर्जांची मुदत वाढल्यामुळे निवड प्रक्रियेला अधिक वेळ लागणार असून, मंडळाच्या अधिकृत स्थापनेसाठीही आणखी प्रतीक्षा करावी लागणार आहे.

## पुणे जिल्ह्यात पावसाची जोरदार हजेरी; गिरिवनमध्ये सर्वाधिक ३८ मिमी पावसाची नोंद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यात गुरुवारी (२३ जुलै) सकाळी ८.३० ते सायंकाळी ५.३० या कालावधीत अनेक भागांत पावसाने हजेरी लावली. जिल्ह्यातील गिरिवन येथे सर्वाधिक ३८ मिमी पावसाची नोंद झाली. त्याखालोखाल माळीण येथे २८ मिमी आणि कुर्वंडे येथे २६ मिमी पाऊस झाला. त्यामुळे डोंगराळ भागांसह ग्रामीण परिसरात पावसाचा जोर अधिक असल्याचे दिसून आले. याशिवाय निमगिरी येथे १६ मिमी, भोर येथे १२.५ मिमी आणि बल्लाळवाडी येथे ७.५ मिमी पावसाची नोंद झाली. शहर परिसरात तुलनेने हलका पाऊस झाला असून पाषाण येथे ५.४ मिमी, तळेगाव आणि एनडीए येथे प्रत्येकी ४ मिमी, तर शिवाजीनगर येथे ३.५ मिमी पावसाची नोंद झाली.

चिंचवडमध्ये २ मिमी, राजगुरूनगर आणि कोरेगाव पार्क येथे प्रत्येकी १.५ मिमी, तर दापोडी, हडपसर, शिरूर आणि नारायणगाव येथे प्रत्येकी ०.५ मिमी पाऊस झाला.

# टीम इंडियाचा ६ सामने गमावल्यानंतर पहिला विजय! श्रेयस अय्यरच्या नेतृत्त्वाखाली भारताने मारली बाजी


## वैभव सूर्यवंशीचा अर्धशतकासह वर्ल्ड रेकॉर्ड! क्रिकेट इतिहासात अशी कामगिरी करणारा जगातील पहिलाच फलंदाज

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**हरारे । प्रतिनिधी**

वैभव सूर्यवंशीने वादळी खेळी करत आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये अखेरीस आपली छाप पाडली आहे. हरारेमध्ये झिम्बाब्वेविरुद्धच्या पहिल्या टी-२० सामन्यात या डावखुऱ्या फलंदाजांने शानदार अर्धशतक झळकावलं. सूर्यवंशीने अवघ्या १८ चेंडूंत अर्धशतक पूर्ण केलं. १५ वर्षांच्या वैभव सूर्यवंशीचं आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील हे पहिलंच अर्धशतक ठरलं. यासह वैभवने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये मोठा विश्वविक्रम आपल्या नावे केला आहे.

इंग्लंड दौऱ्यादरम्यान पदार्पण केल्यानंतर वैभव सूर्यवंशीला दोन्ही सामन्यात फारशी चांगली खेळी करता आली नाही. त्यामुळे वैभवच्या कामगिरीबाबत प्रश्न उपस्थित केले जात होते. पण आता झिम्बाब्वेविरूद्ध टी-२० मालिकेतील पहिल्याच सामन्यात त्याने अर्धशतकी खेळी साकारत आपला फॉर्म दाखवून दिला आहे. वैभवने सामन्याच्या दुसऱ्याच षटकात २ षटकार एक



चौकार लगावत २० धावा कुटल्या होत्या. अर्धशतक करताच वैभव पुढच्या चेंडूवर झेलबाद झाला. बाद होण्यापूर्वी वैभवने १९ चेंडूत ४ चौकार व ४ षटकारांसह २६३च्या स्ट्राईक रेटने ५० धावांची खेळी केली.

वैभव सूर्यवंशी हा आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये अर्धशतक झळकावणारा सर्वात तरुण खेळाडू ठरला आहे. तसेच, सर्वात कमी चेंडूत टी-२० अर्धशतक पूर्ण करणारा सर्वात तरुण खेळाडू होण्याचा विक्रमही त्याच्या नावावर आहे. १५ वर्षे आणि ११८ दिवस वय असताना हे अर्धशतक झळकावत वैभवने नेपाळच्या कुशल मल्लाचा यापूर्वीचा विक्रम मोडला. मल्लाने ८ फेब्रुवारी २०२० रोजी कीर्तिपूर येथे अमेरिकेविरुद्धच्या एकदिवसीय सामन्यात, १५ वर्षे आणि ३४० दिवस वय असताना अर्धशतक केलं होतं.

आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वात कमी वयात पहिलं अर्धशतक झळकावणारे पुरुष फलंदाज

१५ वर्षे ११८ दिवस - वैभव सूर्यवंशी (भारत) विरुद्ध झिम्बाब्वे, हरारे, २०२६ (टी-२०)

१६ वर्षे २१३ दिवस - सचिन तेंडुलकर (भारत) विरुद्ध पाकिस्तान, फैसलाबाद, १९८९ (कसोटी)

१६ वर्षे २१४ दिवस - शाहिद आफ्रिदी (पाकिस्तान) विरुद्ध श्रीलंका, नैरोबी, १९९६ (वनडे)

१७ वर्षे ३९ दिवस - मुश्ताक मोहम्मद (पाकिस्तान) विरुद्ध भारत, कोलकाता, १९६० (कसोटी)

१७ वर्षे ६३ दिवस - मोहम्मद अशरफुल (बांगलादेश) विरुद्ध श्रीलंका, कोलंबो (डडउ), २००१ (कसोटी)

# जेव्हा उत्तरपत्रिकेपेक्षा सत्तेची प्रतिमा महत्त्वाची ठरते; दिल्ली हायकोर्टात लोकशाहीची परीक्षा!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

देशभरातील परीक्षा व्यवस्थेतील कथित अनियमितता, विद्यार्थ्यांचा वाढता संताप आणि दिल्लीतील जंतर-मंतरवरील आंदोलन आता न्यायालयाच्या दारात पोहोचले आहे. दिल्ली उच्च न्यायालयाने २३ जुलै २०२६ रोजी 'कॉकरोच जनता पार्टी' (उेलज्ञ्रेंरलह गरपींर झरीूं - उगझ) यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या आंदोलनाची चौकशी करण्याची मागणी करणारी जनहित याचिका (झखङ) सुनावणीसाठी स्वीकारली आहे. मुख्य न्यायमूर्ती डी. के. उपाध्याय आणि न्यायमूर्ती तेजस करिया यांच्या खंडपीठासमोर ही याचिका तातडीने उल्लेख करण्यात आली असून, तिची सुनावणी २४ जुलै २०२६ रोजी होणार आहे.

हे आंदोलन २० जून २०२६ पासून नवी दिल्लीतील जंतर-मंतर येथे सुरू असून, त्यामागील मुख्य मागणी म्हणजे केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी परीक्षा व्यवस्थेतील कथित अनियमिततेची नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा. गेल्या काही महिन्यांत विविध स्पर्धा परीक्षा, प्रवेश परीक्षा आणि भरती प्रक्रियांबाबत निर्माण झालेल्या प्रश्नांच्या पार्श्वभूमीवर हे आंदोलन सुरू करण्यात आले होते.

या आंदोलनाला देशभरातील विद्यार्थी, पालक आणि विविध सामाजिक संघटनांकडून प्रतिसाद मिळत असताना, दिल्लीतील पोलिस कारवाईही वादाच्या केंद्रस्थानी आली. आंदोलनादरम्यान काही आंदोलकांना हटविण्यात आल्याचा, तसेच काहींना ताब्यात घेण्यात आल्याचा आरोप करण्यात आला. हवामान कार्यकर्ते आणि शिक्षण क्षेत्रातील अभ्यासक सोनम वांगचुक यांच्याशी संबंधित घटनांमुळेही या आंदोलनाकडे राष्ट्रीय स्तरावर लक्ष वेधले गेले. जंतर-मंतरवरील आंदोलनस्थळी त्यांच्या छायाचित्रासह भारतीय राज्यघटनेची प्रत ठेवण्यात आल्याचे दृश्य चर्चेचा विषय ठरले.

दरम्यान, या संपूर्ण प्रकरणात दोन वेगवेगळे प्रश्न समोर आले आहेत. पहिला म्हणजे परीक्षा प्रक्रियेतील कथित अनियमितता आणि त्यावरील सरकारी उत्तरदायित्व, तर दुसरा म्हणजे लोकशाही पद्धतीने आंदोलन करण्याच्या अधिकाराच्या वापराबाबत प्रशासनाची भूमिका. आता या दोन्ही मुद्द्यांवर न्यायालयीन पातळीवरही चर्चा होण्याची शक्यता आहे.

विरोधी पक्ष आणि विद्यार्थी संघटनांचा आरोप आहे की, परीक्षा व्यवस्थेबाबत देशभरात वारंवार प्रश्न उपस्थित होत असतानाही सरकारने विश्वासार्ह आणि पारदर्शक सुधारणा करण्याऐवजी आंदोलने नियंत्रणात ठेवण्यावर अधिक भर दिला. दुसरीकडे, सरकारने यापूर्वी परीक्षा प्रक्रियेत सुधारणा, तंत्रज्ञानाचा वापर आणि गैरप्रकार रोखण्यासाठी विविध उपाययोजना सुरू असल्याचे सांगितले आहे. मात्र या प्रकरणात न्यायालयासमोर कोणती भूमिका मांडली जाते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

कायदेतज्ज्ञांच्या मते, ही सुनावणी केवळ एका आंदोलनापुरती मर्यादित राहणार नाही. शांततापूर्ण आंदोलनाचा घटनात्मक अधिकार, सार्वजनिक सुव्यवस्था राखण्याची प्रशासनाची जबाबदारी आणि परीक्षा व्यवस्थेवरील जनतेचा विश्वास या तिन्ही मुद्द्यांचा समतोल साधण्याच्या दृष्टीने या प्रकरणाचे महत्त्व मोठे आहे.

याचिकेवरील सुनावणीत न्यायालय चौकशीचे आदेश देते का, प्रशासनाकडून अहवाल मागवते का किंवा कोणते अंतरिम निर्देश जारी करते, यावर पुढील घडामोडी अवलंबून असतील. त्यामुळे २४ जुलै २०२६ रोजी होणाऱ्या सुनावणीकडे विद्यार्थी, शिक्षण क्षेत्र, राजकीय पक्ष आणि कायदेतज्ज्ञांचे लक्ष लागले आहे.

देशातील परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास, विद्यार्थ्यांचा न्यायाचा प्रश्न आणि लोकशाहीतील आंदोलनाचा अधिकार या तिन्ही मुद्द्यांचा संगम असलेले हे प्रकरण आता न्यायालयीन तपासणीच्या टप्प्यावर पोहोचले असून, त्याचे परिणाम केवळ दिल्लीपुरते मर्यादित न राहता राष्ट्रीय पातळीवरही महत्त्वाचे ठरू शकतात.